# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक ३ फेब्रुवारी, २०२०/ माघ १४, १९४१ शके**

९. **लक्षवेधी सूचना स्वीकारण्याबाबत सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की :-**

**(१) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सोमवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० पासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणाऱ्या सन २०२० च्या दुसऱ्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासाठी द्यावयाच्या लक्षवेधी सूचना पूर्णत: एम.ओ.आय.एस. (MOIS) या संगणक प्रणालीवर ONLINE पध्दतीने शुक्रवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२० रोजी पासून सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यन्त स्वीकारण्यात येतील.**

**(२) ONLINE पध्दतीने प्राप्त होणाऱ्या लक्षवेधी सूचनांना संगणकीय प्रणालीद्वारे आपोआपच अनुक्रमाने नोंदणी क्रमांक दिला जाईल.**

**(३) महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचनेचा विषय हा निकडीचा, सार्वजनिक महत्वाचा, स्पष्ट, मुद्देसूद व एकाच विभागाशी संबंधित असणे आवश्यक आहे.**

**(४) अधिवेशन संस्थगित होण्यापूर्वीचे कार्यालयीन कामकाजाचे पूर्ण ३ दिवस अगोदरचा दिवस हा ONLINE पध्दतीने लक्षवेधी सूचना स्विकारण्यासाठी अंतिम दिवस असेल.**

**(५) लक्षवेधी सूचना स्वीकृत करण्यासंबंधी व स्वीकृत सूचना चर्चेला घेण्यासंबंधीचा संपूर्ण अधिकार हा मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचाच राहील याची कृपया नोंद घेण्यात यावी.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ फेब्रुवारी, २०२०

**राजेन्द्र भागवत,**
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानपरिषद

**प्रती :-**

(१) महाराष्ट्र विधानरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) मा.सभापती व मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव/खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(३) मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी
(४) सचिव (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहायक
(५) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
(६) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालय
(७) मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
(८) संगणक कक्ष **(WEBSITE)**
(९) एम.के.सी.एल कक्ष **(MKCL)**